महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण

जनसंपर्क विभाग

कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.

दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com


==================================================================

जावक क्रमांक – २००६/३०

दिनांक :- १५ जून, २०२४

प्रसिद्धिपत्रक

# बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पात्र गाळेधारकांना दुसऱ्या टप्प्यातही म्हाडा एकत्रित ११ महिन्यांचे भाडे देणार

## चाळीतील भाडेकरूंचे गाळे रिकामे करून घेण्यात सुलभता यावी व यासाठी गाळेधारकांचा प्रतिसाद वाढण्याच्या दृष्टीने म्हाडा प्रशासनाचा निर्णय

मुंबई, दि. १५ जून, २०२४ :- बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील जुन्या चाळींमधील भाडेकरूंचे गाळे रिकामे करून घेण्यात सुलभता यावी व यासाठी गाळेधारकांचा प्रतिसाद वाढण्याच्या दृष्टीने प्रकल्पातील पात्र गाळेधारकांना सुरुवातीला ११ महिन्यांचे दरमहा भाडे एकत्रित दिल्यानंतर पुढच्या टप्प्यात एक महिन्याऐवजी आता यापुढे एकत्रित ११ महिन्यांचे भाडे देण्याचा निर्णय म्हाडा प्रशासनाने घेतला आहे.

या पुनर्विकास प्रकल्पातील तीनही चाळींतील असे निवासी/अनिवासी गाळेधारक ज्यांनी म्हाडाकडून संक्रमण शिबिरातील गाळ्याचा विकल्प स्वीकारलेला नाही, अशा गाळेधारकांना म्हाडाकडून भाडे देण्यात येते. सुरुवातीला ११ महिन्याचे एकत्रित भाडे दिल्यानंतर प्रत्येक महिन्याचे भाडे देण्याऐवजी पुन्हा एकत्रित ११ महिन्यांचे भाडे देण्यात यावे, अशी मागणी संबंधित गाळेधारकांकडून करण्यात आली. या मागणीबाबत सकारात्मक विचार करून 'म्हाडा'चे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजीव जयस्वाल यांनी सदर प्रस्तावाला मान्यता दिली आहे.

या निर्णयानुसार यापुढे बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पातील पुनर्वसन सदनिकांमध्ये स्थलांतरीत होतील तोपर्यंत तिन्ही चाळींतील पात्र गाळेधारकांना हा निर्णय लागू असणार आहे. संबंधित कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केल्यानुसार स्वत:ची सोय करून रहात असलेल्या पात्र गाळेधारकांना एकत्रित ११ महिन्यांचे भाडे म्हाडातर्फे देण्यात येणार आहे. तसेच संबंधित कार्यकारी अभियंता कार्यालयाने प्रमाणित केल्यानुसार ११ महिन्यांपेक्षा कमी कालावधीचे असेल तर सदर भाडे अदा केल्यानंतर वास्तव्याच्या कालावधीमध्ये पुढील एखाद्या महिन्याची वाढ होत असेल तर एक महिन्याचे त्यानुसार भाडे अदा करण्यास मुभा देण्यात येणार आहे. सरसकट एकत्रित ११ महिन्यांचे भाडे न देता त्यांच्या संभाव्य वास्तव्याच्या कालावधीपर्यंतच एकत्रितपणे प्रमाणित करून भाडे अदा करण्यात येणार आहे.

बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प हा महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून सद्यस्थितीत वरळी, नायगाव व ना. म. जोशी मार्ग-लोअर परळ बीडीडी चाळ पुनर्विकासाचे काम वेगात सुरू आहे.

सदर पुनर्विकास प्रकल्पांतर्गत चाळीतील पात्र निवासी गाळेधारकांना म्हाडाच्या संक्रमण शिबिरात गाळे उपलब्ध करून देऊन त्यांना स्थलांतरित करण्यात येते. 'म्हाडा'कडे सद्यस्थितीला निवासी पात्र लाभार्थ्यांना संक्रमण शिबिरातील गाळे वाटप करण्यासाठी अपुरे आहेत. त्यामुळे भाडेकरूंना भाडे घेण्याचा विकल्प देण्यात आला आहे. संबंधित पात्र निवासी गाळेधारकांना संक्रमण शिबिर आवास नको असेल तर त्यांना त्यांच्या विकल्पानुसार दरमहा पंचवीस हजार रुपये भाडे म्हाडाकडून अदा केले जाते. चाळीतील

पात्र अनिवासी गाळेधारकांनाही दरमहा नुकसान भरपाई म्हणून पंचवीस हजार रुपये भाडे म्हाडाकडून अदा केले जाते. सदर भाडे अदा करण्यास म्हाडाने सुरुवात केली आहे.

--

**वरळी प्रकल्पातील गाळेधारकांच्या पुनर्वसन सदनिकांची निश्चिती येत्या आठवड्यात**

वरळी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत पुनर्विकसित इमारतीच्या बांधकामाकरिता आवश्यक असलेल्या चाळींमधील पात्र गाळेधारकांना प्रकल्पात उभारण्यात येणाऱ्या प्रस्तावित पुनर्वसन इमारतींमध्ये वितरीत करावयाच्या पुनर्वसन सदनिकांची निश्चिती संगणकीय प्रणालीद्वारे येत्या आठवड्यात 'म्हाडा'तर्फे केली जाणार आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा:

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial